ISSN 2394-5303

Issue-41, Vol-06, May-20

# Printing Area™

International Multilingual Research

Editor

Dr. Bapu G. Gholap

00030

ortional analysis and convenience of digital libraries ........
1 NARENDAR || 70

15) GEOGRAPHICAL STUDY OF CROPPING PATTERN IN KAGAL........
Shri. D. A. Sardesai || 73

16) Immersion of Cybernetic Culture in Today's World: A study .........
Mr. Shashikant S. Shende ||76

17) ISSUES OF BIOPIRACY CONNECTED TO INDEGENOUS .......
ANTU SINGH || 80

18) "FANKAR KALAKAAR USTAD SHARAFAT ALI KHAN
Harmik Singh || 85

19) Children's Literature: Reflection of Society.
Mrs. Shringar Tiwari || 87

20) THE STATE OF MENTAL HEALTH AND AGING IN INDIA
POONAM TRIPATHI || 90

21) The Contribution of Trade in Financial Services to .......
Dr. Brijesh Hiteshbhai Valand, || 96

22) Origin of Development Ethics and Practices at I........
Dr. P. Veerachary , || 101

23) जीवनविमा पत्राची दावापूर्ती करणे :
Prof. Dr. Ronil Kulbhushan Ahale || 106

24) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार आणि कार्याचे अध्ययन
प्रा. वासुदेव वा. भगत || 108

25) भारतीय स्वातंत्र्य लढयात चंद्रपूर नगराचा सहभाग
प्रा.डॉ. कैलास रामचंद्र भांडारकर ||110

26) संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील महिलांच्या शैक्षणिक.......
संजय बबनराव चौधरी || 115

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | May 2018 Issue-41, Vol-06 | 0106 | 000302

6. Crocker, D.A. and T. Linden (eds.) (1998) Ethics of Consumption: The Good Life, Justice, and Global Stewardship (Lanham, MD: Rowman & Littlefield.

7. Crocker, D.A. (1992) "Functioning and Capability: The Ethical Foundations of Sen and Nussbaum's Development Ethic," Political Theory 20.

8. Crocker, D.A. (1991) "Toward Development Ethics," World Development 19.

9. Dower, N. (1988) 'What is Development?—A Philosopher's Answer', Centre for Development Studies Occasional Paper Series, 3, Glasgow: University of Glasgow. Engel, J.R. and J. G. Engel (eds.) (1990) Ethics of Environment and Development: Global Challenge, International Response, Tucson: University of Arizona Press.

10. Gasper, D. (ed.) (1997) Five essays on "The Capabilities Approach to Well-being, Justice and Human Development," Journal of International Development.

11. Gasper, D. (1994) "Development Ethics: An Emergent Field?" in R. Prendergast and F. Stewart (eds.) Market Forces and World Development, London: Macmillan; New York: St. Martin's Press.

❑❑❑

**23**

# जीवनविमा पत्राची दावापूर्ती करणे :

**Prof. Dr. Ronil Kulbhushan Ahale**
Dr. H. N. Sinha Arts & Commerce College,
Patur Dist-Akola

**********

विमेदार व आयुर्विमा महामंडळ यांच्यात झालेल्या आयुर्विमा कराराची रक्कम विमा कराराची मुदत संपल्यानंतर किंवा विमापत्राची मुदत संपूण्यापूर्वी विमेदारास मृत्यू आल्यानंतर देयत होते. आयुर्विमा करारानुसार आयुर्विमा आयुर्विमा महामंडळ अशी रक्कम विमेदारस किंवा विमेदाराच्या वारसास देण्यास जबाबदार असते. विमेदार किंवा विमेदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाने आयुर्विमापत्राच्या रकमेची मागणी महामंडळाकडे करणे हा कराराची पूर्तता करण्याचा क्षय असतो. आयुर्विमा महामंडळाने आयुर्विमापत्राची रक्कम भागविल्यानंतर विमेदार आणि महामंडळ यांच्यातील करार संपुष्टात येतो.

आयुर्विमापत्राची मुदत संपल्याने अथवा आयुर्विमापत्राची मुदत संपण्यापूर्वी विमेदारास मृत्यू आल्याने कराराची रक्कम देय झाल्यानंतर ती प्राप्त करण्यासाठी विशिष्ट पध्दतीचा अवलंब करावा लागाते. त्याचा विचार दोन भागांत खालीलप्रमाणे करता येईल.

**अ) आयुर्विमापत्राची मुदत संपल्याने दावापूर्ती :**

आयुर्विम्याची मुदत संपताच विमेदाराने आयुर्विमापत्र रक्कम प्राप्तीसाठी आयुर्विमा महामंडळास सादर केले पाहिजे. त्यानंतर विमेदाराने आयुर्विम्याचे पैसे प्राप्त करण्यासाठी खालील पध्दती अनुसरावी.

**१) आयुर्विमापत्र सादर करणे.**

आयुर्विम्याची मुदत संपताच विमेदाराने आयुर्विमापत्र रक्कम प्राप्तीसाठी आयुर्विमा महामंडळास सादर करावे लागते. आधुनिक काळात आयुर्विमा महामंडळाच्या कार्यपध्दतीत बरेच बदल झाले असून विमापत्राची दातव्य तिथी जवळ येताच आयुर्विमा महामंडळामार्फत विमेदारास विमापत्राची रक्कम विशिष्ट तारखेस देय होत असल्याचे कळविले जाते. तसेच विमा रक्कम देय तारखेस देणे शक्य व्हावे यासाठी विमेदाराने कोणत्या गोष्टी पूर्ण कराव्यात तेही कळविले जाते. विमेदार पगारी सेवक असेल तर आयुर्विमा महामंडळाव्दारे विमेदार नोकरी करत असलेल्या संस्थेच्या प्रमुखास विशिष्ट महिन्यापासून विमेदाराच्या पगारातून हप्ता कापून घेणे बंद

ISSN: 2394 5303 | Impact Factor 5.011(IIJIF) | Printing Area™ International Research journal | May 2018 Issue-41, Vol-06 | 0107



करण्याविषयी कळविले जाते.

२) वयाचा दाखला :

आयुर्विमामापत्र घेताना विमेदाराने वयाचा दाखला किंवा जन्मतारखेचा पुरवा दिलेला नसेल म्हणजेच आयुर्विमा महामंडळाने विमेदाराचे वय मान्य केले नसेल तर वयाचा दाखला द्यावा लागतो. वयाचा दाखला किंवा पुरावा म्हणून जन्मतारखेचे प्रमाणपत्र नगरपालिकेतील वयाच्या नोंदीचा उतारा, शाळेच्या रजिस्टरमधील जन्मतारखेच्या नोंदीचे प्रमाणपत्र, नोकरी करीत असलेल्या ठिकाणच्या सेवापुस्तीकेतील जन्मतारखेच्या नोंदीचा उतारा, जन्मटिपण इत्यादिपैकी कोणते तरी एक प्रमाणपत्र सादर करावे लागते.

३) बेचनपत्र सादर करणे :

विमेदाराने आयुर्विमापत्राचे बेचन केले असेल अगर फरेबेचन केले असेल तर मूळ बेचनपत्र अथवा फेर बेचनपत्र विमापत्राबरोबर आयुर्विमा महामंडळास सादर केले पाहिजे.

४) डिस्चार्ज फार्म भरून देणे :

वरील कागदपत्रे पाठविल्यानंतर आयुर्विमा महामंडळ विमेदारास डिस्चार्ज फॉर्म पाठविते. या फॉर्मवर सर्व आवश्यक माहिती भरून व आवश्यक रकमेची मुद्रा लावून त्यावर सही करावी लागते. तसेच विमा प्रतिनिधीचीही सही घ्यावी लागते. डिस्चार्ज फॉर्म आयुर्विमा महामंडळाकडे पाठवावा लागतो.

५) विमा रक्कम देणे :

वरील प्रमाणे सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर आयुर्विमा महामंडळ विम्याच्या रकमेचा धनादेश विमेदारास देते.

ब) विमेदाराच्या मृत्यूनंतर दावापूर्ती :

विमापत्राची मुदत संपण्यापूर्वी विमेदारास मृत्यू आला तर विमापत्राची रक्कम विमेदराच्या वारसास दिली जाते. विमेदाराने आयुर्विमापत्रात ज्या व्यक्तिचे नाव वारस म्हणून लावले आहे, त्या व्यक्तिला आयुर्विमापत्राचे पैसे द्यावे लागतात. विमेदाराच्या आयुर्विमापत्राच्या रकमेवर ज्या व्यक्तिचा वारस म्हणून हक्क आहे अशा व्यक्तीने प्रथम विमेदारास मृत्यू आल्याचे निवेदन आयुर्विमा महामंडळास द्यावे लागते. तसेच आयुर्विमा पत्राची रक्कम मिळाण्याच्या दृष्टिने विमेदारच्या वारसाने आयुर्विमा महामंडळास पुढील कागदपत्रे सादर करावी लागतात.

१) विमेदाराच्या मृत्यूची खबर देणे :

विमेदाराशी संबधित व्यक्ती किंवा वारसाने प्रथम विमेदाराचा मृत्यू झाल्याची बातमी पत्राव्दारे महामंडळास कळवावी लागते. पत्रात विमेदारास मृत्यू आल्याची तारखी, मृत्यूचे कारण आणि विमापत्राचा क्रमांक इत्यादी माहिती दिलेली असावी. तसेच या पत्राबरोबर विमापत्र आणि विमापत्राचे बेचन केले असल्यास बेचनपत्र महामंडळास पाठवावे.

२) मृत्यूचा पुरावा :

विमापत्राची मुदत संपण्यापूर्वी विमेदारास मृत्यू आल्याने आयुर्विम्याची रक्कम देय होत असेल असे पैसे ज्या वारस व्यक्तीस मिळणार आहे त्याने विमेदाराच्या मृत्यूचा पुरावा महामंडळास सादर करावा लागतो.

अ) मृत्यूचा पुरावा म्हणून विमेदार आजारी असतांना त्याच्या शेवटच्या काळात ज्या डॉक्टरने त्याच्यावर औषधोपचार केला त्या डॉक्टरचे प्रमाणपत्र.

ब) विमेदाराचे मृत्यूनंतर जेथे दहन केले असेल तेथील अधिकाऱ्याचे प्रमणपत्र.

क) विमेदारास खून, आत्महत्या किंवा अपघात यासारख्या कारणाने मृत्यू आलेला असल्यास त्यासंबंधीचा पोलिस पंचनामा व कॉरोनर्स रिपोर्टची प्रत पाठवावी लागते.

ड) जन्म-मृत्यूची नोंद ठेवणाऱ्या सार्वजनिक नोंद कचेरीचा विमेदाराच्या मृत्यूबाबत दाखलाही द्यावा लागतो.

३) मालकाचे प्रमाणपत्र :

विमेदार ज्या ठिकाणी नोकरीवर होता त्या संस्थेच्या मालकाचे प्रमाणपत्र विमेदाराच्या वारसाने सादर करावे लागते. त्यात मृत विमेदाराच्या नोकरीबाबतची मागील तीन वर्षाची माहिती, त्यात मृत्यूबाबतची माहिति, विमेदार शेवटी केव्हा हजर होतो त्याची माहिती, विमेदाराचे आजारीपण, सेवेतून गैरहजर राहिल्याची माहिती, विमेदाराने घेतलेल्या सकारण हक्काच्या व आजारीपणाच्या रजा तसेच विमेदार मृत झाल्याची माहिती केव्हा व कोणाकडून मिळाली इत्यादी तपशील प्रमाणपत्रात द्यावा लागतो. हे प्रमाणपत्र महामंडळाकडे उपलब्ध असणाऱ्या छापील फॉर्मवरून भरून द्यावे लागते.

४) ओळखपत्र :

विमेदारास ओळखत असणाऱ्या परंतु विमेदारासंबंधित नसणाऱ्या व विमा रकमेवर हक्क नसणाऱ्या व्यक्तीने विमेदाराविषयी ओळखपत्र द्यावे लागते. सदर व्यक्तीने विमेदाराच्या मृत्यूनंतर त्यांचा मृतदेह पाहिलेला असावा. ओळखपत्रात विमेदार आपणास किती वर्षे माहित होता? त्यास शेवटी केव्हा पाहिले? विमेदाराचे दहन करण्यात आले की दफन करण्यात आले? विमेदारास मृत्यू कोणत्या ठिकाणी आला? विमेदाराने विमा घेतल्याचे आपणास माहिती होते काय? या प्रश्नांची उत्तरे ओळखपत्रात द्यावी लागतात. तसेच सदर ओळखपत्र देणाऱ्या व्यक्तीने विमेदाराच्या मृत्यूची तारीख व मृत्यूचे कारण, त्याच्या शेवटच्या आजारपणाचा कालावधी, विमेदारचा